# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. ६५६ /जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक /१२/२०१८

## '' अमली पदार्थ विक्री करिता बाळगणाऱ्या आरोपीस ५ वर्ष कारावास व १०,०००/–रू. द्रव्यदंडाची शिक्षा ''

**पोलीस ठाणे भंडारा :–** यातील आरोपी नेहरू वार्ड वरठी येथे राहणारा ईसम हर्षद उर्फ शेरू राहुल मेश्राम वय २० वर्ष यास गांजा हा अमली पदार्थ अवैध रित्या बाळगल्याचे आरोप सिध्द झाल्याने आज दिनांक १४/१२/२०१८ रोजी **मा. अतिरिक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा.**यांनी आरोपीस ५ वर्ष सश्रम कारावास व १०,०००/–रु. द्रव्यदंडाची शिक्षा व दंड न भरल्यास ६ महिणे सश्रम कारावास शिक्षा ठोठावली.

गुन्हयाची हकीकत अशी की, अमली पदार्थ विरोधी शाखेचे तत्कालीन प्रभारी अधिकारी स.पो.नि. प्रकाश खोब्रागडे यांना मिळालेल्या माहीतीचे आधारे दिनांक १३/०८/१५ रोजी हर्षद उर्फ शेरू राहुल मेश्राम वय २० वर्ष रा. नेहरू वार्ड,भंडारा याचे घरी अमली पदार्थ कायदया अंतर्गत कायदेशिर घर झडती घेतली असता घरझडती मध्ये अवैधरित्या गांजा वजन ०१ किलो ६५ ग्रॅम माल मिळुन आल्याने सपोनि प्रकाश खोब्रागडे यांनी आरोपी विरूध्द कार्यवाई करत सरकार तर्फे पोलीस ठाणे भंडारा येथे तक्रार दिल्यावरून अपराध क्र. ३१५४/१५ कलम २०,२२ अमली औषधी द्रव्य व मनोविकारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनीयम १९८५ (एन. डी.पी.एस. ॲक्ट) अन्वये आरोपी विरूध्द गुन्हा नोंद केला होता.

सदर गुन्हयाचा तपास सपोनि. वाय. एच. किचक यांनी सुरू केला. आरोपीस तात्काळ अटक करून, गुन्हयात साक्षपुरावा गोळा करून आरोपपत्र विशेष सत्र न्यायालय, भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ०१/२०१६ अन्यव मा. न्यायाधिश सा. यांचे समक्ष सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **मा. श्री. आर. पी. पांडे सा. अतिरिक्त सत्र न्यायाधिश** यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट दुर्गा तलमले, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक १४.१२.२०१८

रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी** हर्षद उर्फ शेरू राहुल मेश्राम वय २० वर्ष रा. नेहरू वार्ड,भंडारा यांचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम** २० अमली औषधी द्रव्य व मनोविकारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनीयम १९८५ (एन.डी.पी.एस. ॲक्ट) **अन्वये** ५ वर्ष सश्रम कारावास व १०,०००/–रु. द्रव्यदंडाची शिक्षा १०,०००/–रू दंड न भरल्यास ६ महिणे सश्रम कारावास शिक्षा ठोठावली.तसेच **कलम** २२ अमली औषधी द्रव्य व मनोविकारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनीयम १९८५ (एन.डी.पी.एस. ॲक्ट) **अन्वये** ५ वर्ष सश्रम कारावास व १०,०००/–रु. द्रव्यदंडाची शिक्षा १०,०००/–रू दंड न भरल्यास ६ महिणे सश्रम कारावास शिक्षा ठोठावली

सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, सुधाकर चव्हाण यांचे मार्गदर्शनात पो.हवा. हषवर्धन मेश्राम यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

( जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उप निरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीत